" ज्ञान, चारित्र्य व देशप्रेम संवर्धनासाठी शिक्षण "

समाज जागृती शिक्षण संस्था मुरुड, संचलित

NAAC ACCREDITED WITH 'B' GRADE CGPA-2.01 SCORE

# संभाजी कॉलेज

## (कला, वाणिज्य व विज्ञान)

मुरुड ता.जि.लातूर -४१३५१०

विद्यापीठ अनुदान आयोग मान्यता प्राप्त, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडशी संलग्न व 2(F) & 12 (B) UGC Delhi मान्यताप्राप्त

## शैक्षणिक वर्ष २०१९-२०


* प्र.प्राचार्य *

डॉ.ए.के.पिडगे

एम.ए.एम.फिल., पीएच.डी.

मो.नं.९४२१३६७९००

email : principalsmmurud.2@gmail.com


₹ १००/-

Scanned by CamScanner

' ज्ञान, चारित्र्य व देशप्रेम संवर्धनासाठी शिक्षण '

समाज जागृती शिक्षण संस्था मुरुड, संचलित

# संभाजी कॉलेज

(कला, वाणिज्य व विज्ञान)

मुरुड ता.जि.लातूर -४१३५१०

## GOALS AND OBJECTIVES

- To provide higher educational facilities to rural masses preferably to girls.
- To inculcate Spiritual, moral, social and economic values among the students.
- To contribute towards social commitment.
- To impart education for knowledge, character and partiotism.

### • संचालक मंडळ •

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. बी.एस. (दादा) पटाडे | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. डि.बी.देवकर | उपाध्यक्ष |
| ३) | मा. ॲड. व्हि.वाय.पाटील | सचिव |
| ४) | मा. श्री. एफ.एस.हिंगले | सदस्य |
| ५) | मा. श्री. पी.पी.टेकाळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. ए.बी. छल्लाणी | सदस्य |
| ७) | मा. श्री.एस.एस.मांडे | सदस्य |
| ८) | मा. श्री.के.एम.पुदाले | सदस्य |
| ९) | मा. श्री.पी.बी.कदम | सदस्य |

### • कॉलेज विकास परिषद (CDC) •

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. बी.एस.(दादा) पटाडे | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. डि.बी.देवकर | सदस्य |
| ३) | मा. ॲड. व्हि.वाय.पाटील | सदस्य |
| ४) | मा. श्री. पी.पी. टेकाळे | सदस्य |
| ५) | प्रा. बी.बी.कोकाटे | प्राचार्य प्रतिनिधी |
| ६) | डॉ. आर.एफ. आंबाड | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ७) | डॉ. सौ.एम.एस. कदम | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ८) | प्रा. डि.एम.रणदिवे | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ९) | प्रा. एम.बी. गायकवाड | IQAC.Co-ordinator |
| १०) | श्री. एस.एस. पटाडे | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी |
| ११) | श्री. व्ही.जे. मोटे | माजी विद्यार्थी प्रतिनिधी |
| १२) | श्री. संभाजी सगर | विद्यार्थी संसद सचिव |
| १३) | प्रा.डॉ.ए.के.पिडगे | सचिव |

Scanned by CamScanner



# मनोगत

**विद्यार्थी बंधू भगिनींनो**

सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षात आपले मनःपूर्वक स्वागत व नव शैक्षणिक वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा..!

'ज्ञान, चारित्र्य व देशप्रेम संवर्धनासाठी शिक्षण' हा उदात्त हेतू डोळ्यांसमोर ठेवून मा. श्री.बी.एस. दादा पटाडे व त्यांच्या सहकाऱ्यानी इ.स.१९८२ साली समाज जागृती शिक्षण संस्थेची स्थापना केली. ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीत, शिक्षणाची गैरसोय असताना परिसरातील विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या शिक्षणातील अनंत अडचणी लक्षात घेऊन त्यांना उच्च शिक्षण घेता यावे.या दृष्टिकोनातून या संस्थेने सन १९९० मध्ये मुरुड येथे संभाजी कॉलेज सुरु केले. आज विद्यार्थ्यांचा प्रतिसाद, पालकांचे सहकार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व संस्था चालकांची डोळस दृष्टी यामुळे १९९० मध्ये लावलेल्या यां रोपट्याचे मोठ्या वटवृक्षात रुपांतर झाले आहे. आज या कॉलेजमध्ये ग्रामीण भागातील मुली मोठ्या प्रमाणांत शिक्षण घेत आहेत.

कॉलेजमध्ये कला,वाणिज्य,व विज्ञान या पदवी शिक्षणाबरोबरच एम.ए.मराठी व एम.कॉम. हे पदव्युत्तर कोर्सेस तसेच एम.ए.इंग्रजी हा य.च.म.मु.वि., नाशिक अंतर्गत चालवला जातो. राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास हे एम.ए.कोर्सही लवकरच सुरू होत आहेत.

संस्थेचा के.जी.टू.पी.जी. गुणवत्तापूर्ण अभिनव असा शैक्षिणक पॅटर्न मुरुड सारख्या ग्रामीण भागात राबविला जात आहे. ही निश्चितच अभिनंदनाची बाब आहे.

मागील वर्षी केरळ राज्यामध्ये प्रलय आल्यामुळे तेथे जिवीत व वित्त हानी होऊन प्रचंड नुकसान झाले होते. संस्थीय सामाजिक बांधिलकी (ISR) पार पाडतांना आमचे कॉलेज नेहमी आपत्ती ग्रस्तांना मदत निधीच्या रुपाने योगदान देत आलेले आहे.

२०१८ जुलै, केरळमधील महाप्रलयामुळे तेथील जनजीवन विस्कळीत झाले. त्यांना मदतनिधी म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी रु.१५०००/– चा निधी केरळ राज्याचे मा.मुख्यमंत्री यांचे नावे जमा करुन सामाजिक बांधिलकी दाखवली.

या सर्व उपक्रमातून आपल्या कॉलेजचे नांव महाराष्ट्रातील नामांकित कॉलेजच्या यादीत यावे हे स्वप्न उराशी बाळगून सर्वांना प्रयत्न करायचे आहेत. आपल्या सर्वांच्या सहकार्यामधून निश्चितच लातूर पॅटर्न मुरुड मध्ये साकारेल यावर माझा दृढ विश्वास आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणाऱ्या शैक्षणिक पॅटर्नमध्ये सहभाग नोंदवावा. त्याचप्रमाणे समाजातील सर्व शिक्षणप्रेमींनी व पालकांनी सहकार्य करावे ही विनंती.

**डॉ. ए.के. पिडगे**

प्र.प्राचार्य



Scanned by CamScanner

## * कॉलेजची ठळक वैशिष्ट्ये :

१) कॉलेजची प्रशस्त व सुसज्ज इमारत
२) अनुभवी प्राध्यापक व कर्तव्यदक्ष कार्यालयीन कर्मचारी वृंद
३) निकालाची उत्कृष्ट परंपरा
४) सुजज्ज ग्रंथालय
५) गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन
६) विद्यार्थी व विद्यार्थीनींना स्वतंत्र अभ्यासिकेची सोय
७) गुणवंत विद्यार्थ्यांसाठी बक्षीस योजना
८) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना (GOI) शिष्यवृत्तीची सोय
९) सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती
१०) अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती
११) एकलव्य शिष्यवृत्ती
१२) समाजकल्याण विभागातर्फे दिली जाणारी अपंगासाठीची शिष्यवृत्ती
१३) संगणक अभ्यासक्रमाची सोय
१४) कमवा व शिका योजनेचा गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना लाभ
१५) स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्र
१६) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक चे केंद्र
१७) इंग्रजी विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी Digital English Language Lab. ची सुविधा
१८) भूगोल प्रयोगशाळा

## * प्रवेशासाठी लागणारे कागदपत्र :

बी.ए., बी.कॉम व बी.एस्सी आणि एम.ए: (मराठी) व एम.कॉम. प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेण्यासाठी खालील प्रमाणपत्रे प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१) मूळ टी.सी.
२) टी.सी.च्या तीन सत्यप्रती
३) उत्तीर्ण गुणपत्रिकेच्या तीन सत्यप्रती
४) मागासवर्गीयांसाठी जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत
५) दोन फोटो
६) नादारी,उत्पन्न व अपत्य प्रमाणपत्र (दोन प्रतीमध्ये)
७) शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांसाठी आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुकाची झेरॉक्स

## * कॉलेजमध्ये शिकविले जाणारे विषय

### कला शाखा

* बी.ए. प्रथम वर्ष – सत्र पहिले व दुसरे (CBCS Pattern)

१) इंग्रजी अनिवार्य　　२) मराठी / हिंदी (द्वितीय भाषा)



Scanned by CamScanner

खालील चार गटातून प्रत्येकी एक ऐच्छिक विषय निवडावा. (कोणतेही तीन)

१) मराठी/हिंदी/इंग्रजी २) इतिहास/समाजशास्त्र ३) राज्यशास्त्र/भूगोल ४)अर्थशास्त्र/लोकप्रशासन

**टिप** :- द्वितीय भाषा म्हणून निवडलेला विषय ऐच्छिक विषय म्हणून निवडता येणार नाही.

* **बी.ए. द्वितीय वर्ष**- सत्र तिसरे व चौथै (CBCS Pattern)

बी.ए. प्रथम वर्षासाठी निवडलेले विषय द्वितीय वर्षासाठी कायम राहतील.

**टिप**: बी.ए. द्वितीय वर्षासाठी SEC (Skill Enhancement Course) कोणत्याही एका ऐच्छिक विषयातून निवडणे अनिवार्य आहे.

* **बी.ए. तृतीय वर्ष- सत्र पाचवे व सहावे**

प्रथम व द्वितीय वर्षासाठी निवडलेल्या तीन ऐच्छिक विषयाचे प्रत्येकी दोन पेपर असतील, तसेच पर्यावरण अभ्यासक्रमचा पेपर अनिवार्य असेल.

**टिप**: बी.ए. तृतीय वर्षासाठी SEC (Skill Enhancement Course) कोणत्याही एका ऐच्छिक विषयातून निवडणे अनिवार्य आहे.

* **पदव्युतर विभाग** -

**एम.ए. मराठी** :-

* **प्रवेश पात्रता** :-

एम.ए. मराठी या विषयास प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी, परीक्षा उत्तीर्ण झालेले व ऐच्छिक किंवा द्वितीय भाषा म्हणून मराठी विषय घेतलेले विद्यार्थी पात्र असतील.

**सत्र पहिले**

१) आधुनिक मराठी वाङःमयाचा इतिहास (इ.स. १८१८ ते १९४५)

२) वर्णनात्मक भाषाविज्ञान

३) वाङःमयाचा प्रकाराचा अभ्यासःकविता

४) भाषांतरमीमांसा किंवा व्यवहारिक मराठी

**सत्रदुसरे**

५) आधुनिक मराठी वाङ्.मयाचा इतिहास (इ.स. १९४५ ते २०००)

६) भाषविज्ञानः वर्णनात्मक,ऐतिहासिक व सामाजिक

७) एका वाङःमय प्रकाराचा अभ्यासःकादंबरी

८) भक्तिसंप्रदाय आणि मराठी साहित्य किंवा मराठी भाषेच्या अस्मितेविषयीचे निबंधलेखन

**एम.ए.मराठी (द्वितीय वर्ष) :**

टीप : शैक्षणिक वर्ष २०१४-१५ S.R.T.M.U., Nanded (सत्र तिसरे व चौथे) च्या नवीन अभ्यासक्रमानुसार पेपर राहतील.

## वाणिज्य शाखा

**B.Com.I (sem.I)** (CBCS Pattern)

1) English (Comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
3) Financial Account I
4) Fundamental of Statistics
5) Business Communication-I
6) Business Economics-I
7) Computer for Business

**B.Com.I (sem.II)** (CBCS Pattern)

1) English (Comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
3) Financial Account II
4) Business Math & Statistics
5) Business Communication-II
6) Business Economics-II
7) Tally



Scanned by CamScanner

**B.Com.II (sem.III)** (CBCS Pattern)

1) English (Comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
3) Corporate Accounting -I
4) Cost Accounting - I
5) Principles of Busi.Mgt- I
6) Corporate Law- I
7) Banking & Finance- I
8) Income Tax - I

**B.Com.II (sem.IV)** (CBCS Pattern)

1) English (Comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
3) Corporate Accounting -II
4) Cost Accounting - II
5) Principles of Busi.Mgt- II
6) Corporate Law- II
7) Banking & Finance- II
8) Income Tax - II

**टिप**: बी.कॉम. द्वितीय वर्षासाठी Skill Enhancement Course (SEC) कोणत्याही विषयातील/शाखेतील एक पेपर निवडणे अनिवार्य आहे.

**B.Com.III (sem.V)**

1) Advanced A/c & Auditing -I
2) Management Accounting -I
3) Eco.Dev.& Planning in India -I
4) B.R.F.W. - I
5) Environment Studies - I
6) Group 'B' Mangement
   1) HRM-I
   2) Marketing Management - I
   3) Training - I

**B.Com.III (sem.VI)**

1) Advanced A/c & Auditing -II
2) Management Accounting -II
3) Eco.Dev.& Planning in India -II
4) B.R.F.W. - II

5) Group 'B' Mangement
   1) HRM- II
   2) Marketing Management - II
   3) Porject Work - II

**टिप** : बी.कॉम. तृतीय वर्षासाठी Skill Enhancement Course (SEC) कोणत्याही एका विषयातील/शाखेतील एक पेपर निवडणे अनिवार्य आहे.विद्यापीठाने पेपर्समध्ये बदल केल्यास तो स्विकृत करणे अनिवार्य असेल

* **पदव्युत्तर विभाग :-**
* **एम.कॉम**
* **प्रवेश पात्रता :-**

एम.कॉम. मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.कॉम. ही पदवी धारण केलेली असावी.

**M.Com.I (Sem.I)**

1) Managerial Economics
2) Mgt Function & Behaviour
3) Q.A.for Mgt Application
4) I.B. Environment

**M.Com.I (Sem.II)**

1) A/c for Managerial Decisions
2) C.Tax Planing & Management
3) Operation Research
4) Strategic Management

**M.Com.II (Sem.III)**

1) Financial Management
2) Accounting & Finances
3) Marketing Management-I
4) Research Methodology

**M.Com.II (Sem.IV)**

1) Advanced Finacial Management
2) Advanced Financial Accounting
3) Marketing Management-II
4) Research Project Report



Scanned by CamScanner

## विज्ञान शाखा

**B.Sc.I (Sem.I)** (CBCS Pattern)
1) English (comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
Group (Select One Group)
1) Physics, Chemistry & Maths.
2) Chemistry, Botany & Zoology
(selected subject has two papers)

**B.Sc.I (Sem.II)** (CBCS Pattern)
1) English (comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
Group (Select One Group)
1) Physics, Chemistry & Maths.
2) Chemistry, Botany & Zoology
(selected subject has two papers)

**B.Sc.II (Sem.III)** (CBCS Pattern)
1) English (comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
Group (Select at B.Sc.I)
1) Physics, Chemistry & Maths.
2) Chemistry, Botany & Zoology

**B.Sc.II (Sem.IV)** (CBCS Pattern)
1) English (comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
Group (Select at B.Sc.I)
1) Physics, Chemistry & Maths.
2) Chemistry, Botany & Zoology

**NB :** Skill Enhancement Course (SEC) Paper is Compulsory

**B.Sc.III (Sem V & VI)** (Skill Enhancement Course to compulser for B.sc.II & III)
The Selected Optional Subject at B.Sc, II will be continuted at B.Sc.III (Sem.V&VI) with three papers of each optional and environment study paper is compulsory

**NB :** Skill Enhancement Course (SEC) Paper is Compulsory

टिपः **अत्यंत महत्वाचे –** बी.ए.,बी.,कॉम व बी.एस्सी.प्रथम व द्वितीय वर्षाच्या (CBCS Pattern) पॅटर्ननुसार प्रथम व द्वितीय सत्रामध्ये प्रत्येकी दोन अंतर्गत मुल्यामपन परीक्षा घेण्यात येतील.

## कॉलेजचे नियम

१) विद्यार्थ्यांनी कॉलेजमध्ये नियमितपणे उपस्थित राहणे आवश्यक आहे. ७५ टक्के पेक्षा कमी उपस्थिती असल्यास परीक्षेचा फॉर्म भरता येणार नाही. अनुपस्थितीमुळे होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार असेल.
२) प्रवेश घेताना निवडलेले विषय पुन्हा बदलून मिळणार नाहीत.
३) कॉलेज तर्फे घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षेस उपस्थित असणे अनिवार्य आहे.
४) कॉलेजमध्ये शिस्त पाळणे बंधनकारक राहील. बेशिस्त वर्तन करणाऱ्यावर योग्य ती कडक कारवाई केली जाईल.
५) कॉलेज परिसरात प्रत्येक विद्यार्थ्याकडे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.
६) वर्गात व वर्गाबाहेर शिस्त पाळणे अनिवार्य आहे.
७) कॉलजचे प्राचार्य,प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी असभ्य वर्तन केल्यास कडक कारवाई केली जाईल.या बाबत शिस्त समितीचा निर्णय अंतिम राहील.
८) कॉलेजमध्ये गटबाजी,उध्दट वर्तन,व्हारांड्यात रेंगाळणे,गोंधळ करणे इ. बाबी बेशिस्त वर्तन मानले जाईल.
९) कॉलेज व्यवस्थापनाने दिलेल्या लेखी व तोंडी सूचनांचे काटेकोर पणे पालन करणे आवश्यक आहे.
१०) स्नेह-संमेलनाचे आयोजन हे त्या वेळचे परिस्थितीवर अवलंबून असेल. मा. प्राचार्याचा निर्णय अंतिम असेल.
११) कॉलेजमध्ये वेशभूषा+ केशभूषा ही सर्वसामान्य असणे अनिवार्य आहे.
१२) कॉलेजमधील स्थावर जंगम मालमत्तेचे नुकसान झालेले आढळून आल्यास,संबंधिताकडून त्याची भरपाई करुन घेणेसाठी दंडात्मक कार्यवाहीचे सर्वाधिकार मा. प्राचार्यांना असतील.
१०) इमारत,सूचनाफलक,डेस्क,बोर्ड इत्यादीवर विद्यार्थ्यांनी काहीही लिहू नये तसे आढळून आल्यास संबंधित विद्यार्थ्याचे नांव कॉलेजमधून कमी करण्यात येईल.
११) कॉलेज तर्फे दिल्या जाणाऱ्या सूचना दररोज सूचना फलकावर पाहणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी असेल.



Scanned by CamScanner

१२) प्रथम सत्रात प्रवेश रद्द करावयाचा असेल तर त्या विद्यार्थ्यास प्रथम सत्राची पूर्ण फिस भरावी लागेल. द्वितीय सत्रात प्रवेश रद्द करावयाचा असेल तर संपूर्ण फिस भरावी लागेल.

१३) कॉलेजच्या परिसरात पान,तंबाखू,मावा,किंवा गुटखा इ. सेवन केल्याचे आढळून आल्यास सदरील विद्यार्थ्याचा प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येईल.

१४) कॉलेजच्या परिसरात मोबाईल वापरता येणार नाही. आढळून आल्यास तो जप्त करण्यात येईल.

१५) विद्यार्थ्यांना उपलब्ध असणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणेची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावर असेल. कॉलेज व्यवस्थापनावर याबाबतीत कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१६) सर्व विद्यार्थ्यानी शैक्षणिक तसेच विद्यापीठाकडे भरावे लागणारे शुल्क कॉलेजकडे भरणा करावा लागेल. (सदरच्या रक्कमा शिष्यवृत्ती स्वरुपात विद्यार्थ्याच्या बँक खात्यास परस्पर जमा होणार आहेत.)

## कॉलेजचे विविध विभाग

### * क्रीडा विभाग :-

१) विविध पातळीवर आयोजित केल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धासाठी कॉलेजचे संघ पाठविणे जातात.

२) आंतर महाविद्यालयीन स्पर्धा,तालुका,जिल्हा व विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी एखादा खेळाडू किंवा संघ पाठवायचा किंवा नाही, या संबंधीचा निर्णय संबंधित खेळाडू किंवा संघाचा दर्जा पाहुन ठरविले जाईल.

३) कॉलजेच्या क्रीडा विभागाच्या निवड समितीचा निर्णय अंतिम राहील

४) क्रीडा स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी लेखी स्वरुपात आपले नाव संबंधिताकडे वेळेत नोंदविलेले नसेल,तर त्या विद्यार्थ्यांचा संघ निवडीच्या वेळी विचार केला जाणार नाही.

५) क्रीडा स्पर्धेचे दिवस वगळता इतर कोणत्याही दिवशी खेळाडूंना चाचणी परीक्षेला,दैनंदिन तासिकेला, प्रात्यक्षिकांना अनुपस्थित राहता येणार नाही.

६) कॉलेजच्या अध्यापनाच्या कामात व्यत्यय येईल, अशा प्रकारच्या खेळास किंवा सरावास परवानगी दिली जाणार नाही.

७) खेळाडू म्हणून कोणत्याही प्रकारची अशैक्षणिक सवलत कोणालाही मिळणार नाही.

**टिप :** जर खेळाडू महाविद्यायलीन व विद्यापीठास परीक्षा दरम्यान राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला असेल तर त्याची परीक्षा स्वा.रा.ती.म. नांदेड च्या नियमानुसार होईल.

### राष्ट्रीय सेवा योजना :- (N.S.S.)

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत कॉलजेच्या विद्यार्थ्यांकडून समाजसेवा आणि ग्राम सुधारणा हे राष्ट्रीय कार्य करुन घेतले जाते.प्रामाणिक,होतकरू आणि सेवा करण्याची तळमळ असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या योजनेत सहभागी होता येईल.

राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश घेताना विशिष्ट फॉर्म भरून द्यावा लागेल. नंतर विद्यार्थ्यांची गुणवत्तेवर निवड केली जाईल.या योजनेत ७५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

या योजनेच्या वतीने प्रत्येक वर्षी मुरुड परिसरातील एखाद्या खेडे गावी ७ दिवसाचे निवासी शिबीर अयोजित केले जाते.

या शिबीरासाठी योजनेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधूनच शिबीरार्थीची निवड केली जाते. योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिस्तीचे व नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी शिस्तीचे व नियमांचे पालन करणार नाहीत, त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाते.

या शिबीरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनाच त्यांच्या गुणवत्तेनुसार विद्यापीठ पातळीवर आयोजित केल्या जाणाऱ्या शिबिरास पाठविले जाते. या योजनेअंतर्गत प्रौढ शिक्षण व कार्यात्मक साक्षरता योजना राबविली जाते.



Scanned by CamScanner

* **सांस्कृतिक विभाग -**

कॉलेजमध्ये सांस्कृतिक विभागातर्फे विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. तसेच आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात विद्यार्थ्यांना सहभागी केले जाते. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना विकसित करण्याचे काम या विभागाच्या मार्फत केले जाते या कामकाजात समितीचा निर्णय अंतिम राहील.

* **कमवा व शिका योजना :-**

कॉलेजमध्ये कमवा व शिका योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेचा लाभ काही अत्यंत गरजू विद्यार्थ्यांना मिळू शकतो. कॉलेजचे कामकाज सुरु झाल्यानंतर योजनेचा तपशिल विद्यार्थ्यांना सूचनेद्वारे कळविण्यात येतो.

* **ग्रंथालय :**

१) ओळखपत्राशिवाय पुस्तके मिळणार नाहीत.
२) ओळखपत्र अहस्तांतरणीय आहे.
३) मूळ ओळखपत्र हरवल्यास डयूप्लिकेट ओळखपत्र १० रुपये कार्यालयात जमा केल्यास मिळेल.
४) एका विद्यार्थ्यास एका वेळी दोन पुस्तके मिळतील.
५) ठरवून दिलेल्या तारखेस पुस्तक परत न केल्यास पहिल्या आठवड्यापर्यंत प्रतीदिन १ रु.दंड आकारला जाईल. व तद्नंतर प्रती दिन २ रु. दंड आकारला जाईल. दंड आकारणी करताना सुट्टीचे दिवस मोजले जातील.
६) ग्रंथालयात व अभ्यासिकेत शिस्त व शांतता बाळगावी.
७) संदर्भ ग्रंथ अभ्यासासाठी घरी दिले जातील.
८) स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त असे ग्रंथ, मासिके विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ग्रंथालयाच्या नियमानुसार दिली जातील.

* **विद्यार्थी संसद विभाग :-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या नियमाप्रमाणे कॉलेजमध्ये विद्यार्थी संसदेची स्थापना केली जाते. या साठी वर्ग प्रतिनिधी हे गुणवत्तेनुसार निवडले जातात. तसेच क्रीडा प्रतिनिधी, एन.एस.एस. प्रतिनिधी, सांस्कृतिक प्रतिनिधी,विद्यार्थिनी प्रतिनिधी यांची नावे संबंधित विभाग प्रमुख व प्राचार्य यांच्या सहमतीने निश्चित केली जातात. सर्व प्रतिनिधी मधून गुप्त मतदान पदध्दतीने सचिवाची निवड केली जाते. शैक्षणिक वर्षातील विविध कार्यक्रम या संसदेमार्फत आयोजित केले जातात.

**टिप** :- महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा २०१६-१७ ची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षापासून झाल्यास व स्वा.रा.ती.म. विद्यापीठाने तशी सूचना दिल्यास त्याप्रमाणे विद्यार्थी संसदेची निवड करण्यात येईल.

* **सूचना फलक :-**

कॉलजेच्या सूचना फलकावर वेळोवेळी विविध प्रकारच्या सूचना लावल्या जातात. त्या सर्व सूचना विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वाच्या असतात. विद्यार्थ्यांशी संबंधित असणाऱ्या सूचना,सूचना फलकावर पाहण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांचीच आहे. सूचना न वाचल्या मुळे होणाऱ्या नुकसानीस कॉलेज जबाबदार राहणार नाही. कॉलेजचे दैनंदिन कामकाज सुरू होण्यापूर्वी किंवा सर्व तासिका संपल्या नंतर दररोज सूचनाफलक पाहणे गरजेचे आहे.



Scanned by CamScanner

* **ए.टी.के.टी. एकूण पेपर्सच्या - ( २५ टक्के)**

स्वा.रा.ती.म.वि.नांदेड ए.टी.के.टी. परिपत्रकानुसार प्रथम वर्षाच्या परीक्षेत एटीकेटीसह उत्तीर्ण झाल्याशिवाय द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात प्रवेश मिळणार नाही. तसेच प्रथम वर्ष पुर्णतः उत्तीर्ण होवून द्वितीय वर्षाच्या परीक्षेत एटीकेटीसह उत्तीर्ण झाल्याशिवाय तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळणार नाही.

* **शिक्षणस्फुर्ती सावित्रतीबाई फुले युवती मंच-**

महाविद्यालयातील शिक्षणस्फुर्ती सावित्रीबाई फुले युवती मंच, विद्यार्थीनींच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असून विद्यार्थीनींनी स्वतंत्र, निर्भय व्हावे स्वतंत्रपणे विचार करावा,अभिव्यक्ती अविष्कार प्रकट करण्याचे कौशल्य त्यांच्यामध्ये निर्माण व्हावे,विद्यार्थीनींची सृजनशिलता विकसीत व्हावी यासाठी शिक्षणस्फुर्ती सावित्रीबाई फुले युवती मंच कार्यरत आहे.

* **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र -**

शासकीय व निमशासकीय क्षेत्रात स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होणे हे रोजगार उपलब्धतेच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. म्हणून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र महाविद्यालयात कार्यरत आहे. विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षेचा अभ्यास व्हावा, त्यांना स्पर्धा परीक्षांना सामोरे जाता यावे म्हणून ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा मासिके तसेच विविध ग्रंथ या केंद्रमार्फत उपलब्ध करुन दिले जातात. वेळोवेळी स्पर्धा परीक्षेच्या दृष्टिकोनातून तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केले जातात. नोकरी/रोजगार संबंधी जाहिरात वा पत्रके इ. माहिती विद्यार्थ्यांसाठी सुचना फलकावर लावली जाते.

तसेच महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने थोर महापुरुषांच्या जीवन चरित्रावर आधारित स्पर्धा परीक्षाभिमुख बहुपर्यायी (MCQs) परीक्षेचे आयोजन करुन विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला जातो.

* **e- messages / Wi-Fi .प्रणाली -**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन व विद्यापीठीय शैक्षणिक बाबींची माहिती विहित वेळेत देण्यासाठी व घेण्यासाठी महाविद्यालयामध्ये e- messages / Wi-Fi प्रणाली कार्यरत आहे. (उदा. प्रवेश प्रक्रिया अंतर्गत व विद्यापीठीय परीक्षा विद्यार्थी सेमीनार, प्रात्यक्षिक परीक्षा,शिष्यवृत्ती इ.)

* **संभाजी श्री पुरस्कार**

जो/जी विद्यार्थी-विद्यार्थीनी महाविद्यालयामध्ये नियमीतपणे उपस्थित राहतो/राहते,महाविद्यालयातील सर्व उपक्रमामध्ये हिरीरीने सहभागी होतो/होते, अभ्यासक्रम, क्रीडा मध्ये नेत्रदिपक यश संपादन करतो/करते.विविध कलागुणांचे प्रकटीकरण करतो/करते,विद्यार्थी-विद्यार्थीनी, प्राध्यापक,कर्मचारी यांच्याशी सलोखा तसेच त्याच्या/तिच्या अंगी असणारी विनम्रता व प्रभावी व्यक्तिमत्व या आधारे मा. प्राचार्यांनी गठीत केलेल्या समितीच्या अभ्यासपुर्ण शिफारशीवरुन **'संभाजी श्री'** हा मानाचा पुरस्कार महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंम्मेलनामध्ये दिला जातो.

* **प्रवेशा बाबत :-**

विद्यापीठ परिपत्रकात दिलेल्या प्रवेशाच्या मुदतीतच विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा. विद्यार्थ्यांला प्रवेश देण्याचा किंवा नाकरण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्याकडे राहील.



Scanned by CamScanner

ब) पात्रता प्रमाणपत्र - ( Eligibility Certificate)

प्रथम वर्षाकरिता प्रवेश घेणाऱ्या तसेच विद्यापीठ बदलून प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने पात्रता प्रमाणपत्राच्या ( Eligibility Certificate) फॉर्म प्रवेश अर्जासोबत जोडावा.

जोपर्यंत विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र क्रमांक ( Eligibility Certificate No.) दिला जाणार नाही. तोपर्यंत सदरील विद्यार्थ्याचा प्रवेश तात्पुरत्या स्वरूपाचा राहील.

पात्रता प्रमाणपत्र ( Eligibility Certificate) फॉर्म सोबत गुणपत्रिकेच्या दोन सत्य प्रती जोडाव्यात. जे विद्यार्थी विद्यापीठ बदलून प्रवेश घेत असतील,त्यांनी मायग्रेशन सर्टिफिकेट जोडावे. डी.एड.उत्तीर्ण विद्यार्थ्यांनीही मायग्रेशन सर्टिफिकेट जोडणे आवश्यक आहे.

## शिष्यवृत्ती

अ) भारत सरकार शिष्यवृत्ती

भारत सरकार शिष्यवृत्ती साठी (जी.ओ.आय.स्कॉलरशिप) अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचे आहे.

१) प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी नवीन फॉर्म २) शाळा सोडल्याचा दाखला (सत्य प्रत) ३) पास झालेल्या वर्गाचा मार्क मेमो (सत्य प्रत) ४) जातीचे प्रमाणपत्र (सत्य प्रत)५) मागील वर्षाचा मंजुरी आदेश क्रमांक ६) तहसील कार्यालयाचा पालकाचा उत्पन्नाचा दाखला (२०१८-१९ वर्षाचे उत्पन्न) ७) पालक नोकरीत असतील तर १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ पर्यंत चे वेतन प्रमाणपत्र ८) भारत सरकार शिष्यवृत्ती साठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा S.C.& S.T. प्रवर्गासाठी रु. २००००० व N.T., O.B.C. & S.B.C साठी रु. १०००००च्या आत असणे आवश्यक आहे. ९) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी देना बँक, शाखा मुरुड येथे स्वतःचे खाते उघडणे आवश्यक आहे. १०) लातूर जिल्हा सोडून इतर जिल्ह्याच्या विद्यार्थी असल्यास जिल्हा बदली प्रमाणपत्र समाज कल्याण अधिकाऱ्याचे आणावे. ११) गॅप असेल तर गॅप सर्टिफिकेट आणावे. १२) दोन फोटो १३) आधारकार्ड झेरॉक्स १४) अपत्य प्रमाणपत्र

ब) एकलव्य शिष्यवृत्ती :-

पदवी परीक्षेत ६० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या व पदव्युत्तर वर्गास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वा एकलव्य शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो.

क) केंद्रीय विभागीय शिष्यवृत्ती : या शिष्यवृत्तीच्या नियमात बसणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.



Scanned by CamScanner

## सवलती

**अ) बी.सी.फ्री.शीप –**

ज्या मागासवर्गीय एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील पालकांचे सन २०१८-१९ चे वार्षिक उत्पन्न रु. २,००,००० पेक्षा जास्त आहे. अशा विद्यार्थ्यांनी या सवलतीसाठी विहित नमुन्यात अर्ज करावा. तसेच एकदा अनुत्तीर्ण होऊन प्रवेश घेणाऱ्या मागासवगीर्य प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या सवलतीसाठी अर्ज करता येईल. तसेच एन.टी.ओ.बी.सी.व एस.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी रु. १००००० च्या पुढे उत्पन्न असणाऱ्यास या सवलतीसाठी अर्ज करता येईल.

**ब) ई.बी.सी. सवलत–** (नविन योजनेअंतर्गत राजश्री शाहू महाराज शैक्षणिक शिष्यवृत्ती)
ई.बी.सी. सवलतीसाठी खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
(सर्व कागदपत्रे दोन प्रतीत जोडावित.)

**नादारी अर्ज** – प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी २) उत्पन्नाचे प्रमाणपत्र (२०१८-२०१९) ३) कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र ४) द्वितीय व तृतीय वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्यांनी ई.बी.सी. सवलत पुढे चालू ठेवण्यासाठी असणारा अर्ज करावा. ५) ज्या विद्यार्थ्यांचे पालक (आई वडील) ह्यात नसतील त्यांनी पालक हयात नसल्याचे प्रमाणपत्र दोन प्रतीत द्यावे. ६) ज्या विद्यार्थ्यांचा शिक्षणामध्ये खंड (गॅप) पडलेला असेल त्याने सदरील खंडासाठी गॅप सर्टिफिकेट द्यावे ८) ज्यांच्या पालकांचे सन २०१८-२०१९ चे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/– पेक्षा कमी आहे, अशाच विद्यार्थ्यांना सदरील सवलतीसाठी पात्र समजले जाईल..

**क) प्राथमिक शिक्षकांच्या मुला मुलींना मिळणारी सवलत :–**

ज्या विद्यार्थ्याचे पालक प्राथमिक शिक्षक असतील व ज्यांना या सवलतीसाठी अर्ज करावयाचा असेल, त्यांनी प्रवेश अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत. १) प्राथमिक शिक्षकांच्या मुला मुलींना मिळणाऱ्या सवलतीचा अर्ज दोन प्रतीत २) नोकरीचा दाखला (गट शिक्षण अधिकारी यांच्या स्वाक्षरीचा) दोन प्रतीत ३) कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र दोन प्रतीत ४) गुणपत्रकाची सत्यप्रत (दोन प्रतीत)

## प्रवेश रद्द करणेबाबत

अ) विद्यार्थ्याने कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश रद्द करावयाचा असल्यास त्यास नियमानुसार कॉलेजची प्रथम सत्राची संपूर्ण फिस भरावी लागेल.

विद्यार्थ्यास कॉलेजच्या सदरील काळाचा दाखला देण्यात येईल, परंतु कोणत्याही कारणास्तव प्रवेशाच्या वेळी कॉलेजकडे देण्यात आलेले मूळ प्रमाणपत्रे व त्याच्या सत्यप्रती प्रवेश रद्द केल्यानंतर मिळणार नाहीत.



Scanned by CamScanner

ब) या कॉलेजमधील आपला प्रवेश रद्द करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने दाखला मागणी अर्जासोबत खालील बाबींची पूर्तता केल्यानंतर तिसऱ्या दिवशी दाखला मिळेल. टी.सी.ची दुसरी प्रत (Duplicate) मिळण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर रु. ५००/- फिस आंकारण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कार्यालयीन येणे (No Dues) | ३) | ग्रंथालयीन येणे (No Dues) |
| २) | प्रयोगशाळा येणे (No Dues) | ४) | जिमखाना येणे (No Dues) |

## पारितोषिक

१) कै. मुकूंदराव खोसे यांचे स्मरणार्थ वाणिज्य पदवी परीक्षेत प्रथम येणाऱ्यास रु. १००१/-

२) कै. किसनराव रखमाजी पिडगे यांचे स्मरणार्थ बी.ए.पदवी परीक्षेत प्रथम येणाऱ्यास रु. १००१/-

३) कै. विनोद भालचंद्र बुबणे यांचे स्मरणार्थ विज्ञान पदवी परीक्षेत प्रथम येणाऱ्यास रु. १५०१/-

४) कै. पार्वतीबाई मोहनराव रणदिवे यांचे स्मरणार्थ पदवी परीक्षेत इतिहास विषयात प्रथम येणाऱ्यास रु. १००१/-

५) कै. गोजरबाई बाबुराव गायकवाड यांचे स्मरणार्थ पदवी परीक्षेत इंग्रजी विषयात प्रथम येणाऱ्यास रु. १००१/-

६) कै. गिताबाई व्यंकटी चुणचुणे यांचे स्मरणार्थ पदवी परीक्षेत मराठी विषयात प्रथम येणाऱ्यास रु. १००१/-

७) कै. तुकाराम पंढरीनाथ क्षिरसागर व कै. मनुबाई तुकाराम क्षिरसागर यांचे यांचे स्मरणार्थ आंतरविद्यापीठ स्तरावर सहभाग मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस ट्रॅकसूट

८) कै. रघुसिंग चव्हाण यांचे स्मरणार्थ पदवी परीक्षेत राज्यशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्यास रु. १००१/

९) कै. संजीवनी केशवराव कदम यांचे स्मरणार्थ ऐच्छिक इंग्रजी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनिस रु. १००१/

१०) कै. प्रा.डॉ.तानाजी जाधव यांचे स्मरणार्थ प्रा.महेश भोसले यांच्याकडून वरील प्रत्येकास स्मृतीचिन्ह



Scanned by CamScanner

## रॅगिंग प्रतिबंधक कायद्या संबंधी सूचना

१) मा. सर्वोच्च न्यायालय, यु.जी.सी., महाराष्ट्र शासन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांनी निर्देशित केल्याप्रमाणे रॅगिंग हा शिक्षण क्षेत्रातील गंभीर गुन्हा आहे. विद्यार्थ्यांकडून शारीरिक इजा करणे, मोठ्याने दंगा करणे, भिती दाखवणे, विनाकारण चिडविणे, आर्थिक शोषण करणे, पत्र,फोन, ई–मेल, मोबाईल,फोटो,एस.एम.एसद्वारे इतर विद्यार्थ्यांना त्रास देणे, अशा बाबी रॅगिंग या सदरात मोडतात. सदरील गुन्हा ज्या विद्यार्थ्यांकडून घडेल अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश ताबडतोब रद्द केला जाईल व त्याच्यावर कायदेशीर केली जाईल.

२) विद्यार्थी आणि पालकांनी विहित नमुन्यातील शपथपत्र प्रवेश घेतेवेळी कॉलेजमध्ये सादर करावयाचे आहे.

३) रॅगिंग संदर्भातील कृती व शिक्षा या संबंधीचे सक्षम कार्यालयाचे नियम नोटीस बोर्डावर लावण्यात आलेले आहे. शपथपत्राचा नमुना माहिती पुस्तिके सोबत जोडला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांनी वेळोवेळी पाठविलेल्या परिपत्रकानुसार अभ्यासक्रमात व इतर नियमात बदल केल्यास असे बदल आपणास लागू होतात. यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्राचार्य**
संभाजी कॉलेज (कला,वाणिज्य व विज्ञान,) मुरुड



Scanned by CamScanner

# संभाजी कॉलेज (कला वाणिज्य व विज्ञान) मुरुड ता.जि.लातूर

## Sambhaji College, Murud. Classwise Fees ( Academic Year 2018-19)

| Sr. No. | Perticular | B.A. I | B.A. II | B.A. III | B.Com I | B.Com II | B.Com III | B.Sc. I | B.Sc. II | B.Sc. III | M.A. I | M.A. II | M.Com. I | M.Com. II |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | Registration Fees | 20 | - | - | 20 | - | - | 20 | - | - | 30 | - | 30 | - |
| 2) | Admission Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 3) | Eligibility Fees | 110 | - | - | 110 | - | - | 110 | - | - | 110 | - | 110 | - |
| 4) | Tuition Fees | 1000 | 1000 | 1000 | 1000 | 1000 | 1000 | 4000 | 4000 | 4000 | 4000 | 4000 | 4000 | 4000 |
| 5) | Library Fees | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 250 | 250 | 250 | 250 |
| 6) | Lab. Fees | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 300 | 300 | 300 | - | - | - | - |
| 7) | Student Al. Fees | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 8) | ID Card Fees | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 9) | University & Sports Fees | 165 | 165 | 165 | 165 | 165 | 165 | 165 | 165 | 165 | 165 | 165 | 165 | 165 |
| 10) | Games & Gymkhana Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 11) | Students Insurance Fees | 08 | 08 | 08 | 08 | 08 | 08 | 08 | 08 | 08 | 08 | 08 | 08 | 08 |
| 12) | Gathering Fees | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 13) | Magazine Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 14) | Student Welfare Fees | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 15) | Ashwamedh Fees | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 16) | Student Council Fees | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 17) | College Dev. Fees | 17 | 17 | 17 | 17 | 17 | 17 | 17 | 17 | 17 | 17 | 17 | 17 | 17 |
| 18) | Rellef Fund Fees | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 |
| 19) | Youth Festival Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 20) | Book Bank Fees | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 21) | Medical Fees | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 22) | College Exam Fees | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 23) | Eam & Learn Fees | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 24) | Project Work Fees | - | - | - | - | - | 100 | - | - | - | - | - | - | 100 |
| 25) | Env. Study Fees | - | - | 150 | - | - | 150 | - | - | 150 | - | - | - | - |
| 26) | E. Suvidha | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 27) | Other Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 28) | N.S.s. | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| | **Total** | 2335 | 2205 | 2355 | 2335 | 2205 | 2455 | 5485 | 5355 | 5505 | 5295 | 5155 | 5295 | 5255 |

नोट : १) टयुशन फिसची रक्कम फक्त पूर्ण फिस भरणारे, विना अनुदानित वर्ग व पुनःप्रवेशित विद्यार्थ्यासाठी लागू राहील.

२) महाराष्ट्र शासन व स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांनी फिस मध्ये काही बदल केल्यास फरकाची रक्कम भरणे बंधनकारक राहील.



Scanned by CamScanner

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**अंतर्गत**

**अभ्यासकेंद्र संभाजी कॉलेज, मुरुड ता.जि.उस्मानाबाद**

जे विद्यार्थी कॉलेजमध्ये नियमितपणे येऊन शिक्षण घेऊ शकत नाहीत व व्यापार, उद्योगात गुंतलेले आहे. अशा पुरुष व महिलांसाठी घर बसल्या शिक्षण घेण्यासाठी कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ,नाशिक चे अभ्यासकेंद्र चालवले जाते.

**या अभ्यासकेंद्रावर पुढील शिक्षणक्रम राबविले जातात.**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्वतयारी | पात्रता ८ वी,९वी,१०वी व १२ वी नापास |
| २. | बी.ए./बी.कॉम प्रथम वर्ष | पात्रता १२ वी पास किंवा पुर्वतयारी उत्तीर्ण |
| ३. | बी.ए./बी.कॉम द्वितीय वर्ष | पात्रता बी.ए./बी.कॉम प्रथम वर्ष पास |
| ४. | बी.ए./बी.कॉम तृतीय वर्ष | पात्रता बी.ए./बी.कॉम द्वितीय वर्ष पास |
| ५. | एम.ए.मराठी/एम.इंग्रजी | पात्रता कोणत्याही विद्यापीठात बी.ए./बी.कॉम/बी.एस्सी. पदवीधर |

**: प्रवेशसाठी संपर्क :**

| डॉ. ए.के.पिडगे | प्रा.एम.एस.बिडवे | श्री.बी.ए.मांडवकर | श्री.बी.एन.घुटे |
|---|---|---|---|
| केंद्र प्रमुख | केंद्र संयोजक | केंद्र सहाय्यक | सेवक |
| ९४२१३६७९०० | ९७६७७६७९७१ | ८९७५५७३९८१ | ७८७५८७५९० |



Scanned by CamScanner

संभाजी कॉलेज (कला वाणिज्य व विज्ञान) मुरुड ता.जि.लातूर

# Sambhaji College, ( Arts, Comm.& Science) Murud.

Tq.Dist.Latur

Academic Calendar - 2019-20

## (Term - First)

| Sr.No. | Proposed Activities | Date / Period |
|---|---|---|
| 1) | Opening Day of the College | 17/06/2019 |
| 2) | Commencement of Admission Process | UG - 01-06-2019<br>PG - 17-06-2019 |
| 3) | Display of Time-Table | 24 June 2019 |
| 4) | Commencement of Classes | 01 July 2019 |
| 5) | Wel- come programme for newly enrolled students | First week of July 2019 |
| 6) | Formation of different study Associations | August 2019 |
| 7) | Formation & Inauguration of Student Council | As per University Guidelnes |
| 8) | Inauguration of Study Associations | Second week of Sept.2019 |
| 9) | 1st C.B.C.S. Internal Exam | Third week of August.2019 |
| 10) | II nd C.B.C.S. Internal Exam | Third week of Sept. 2019 |
| 11) | University winter Exam | As per University programme |
| | | |
| | **(Term - Second)** | |
| 12) | N.S.S Special Resi Camp | As per University programme |
| 13) | 1st C.B.C.S. Internal Exam | Third Week of Jan - 2020 |
| 14) | Educational Tour | Fourth Week of Jan - 2020 |
| 15) | Annual Social Gathering | 1st Week of Feb. - 2020 |
| 16) | II nd C.B.C.S. Internal Exam | Third Week of Feb. - 2020 |
| 17) | Send off | 1st Week of March-2020 |
| 18) | University Summer Exam. | As per University programme |



Scanned by CamScanner

## Sawmi Ramanand Teerth Marathwada University Nanded

### Academic Calendar - 2019-20

### All Affiliated Collegs

| Sr.No. | Proposed Activities | Date / Period |
|---|---|---|
| 1) | First Term | 17/06/ 2019 to 09-11-2019 |
| 2) | Vacation | 10/11/ 2019 to 03-12-2019 |
| 3) | Second Term | 04 /12/2019 to 01/05/2020 |
| 4) | Vacation | 02 /05/2020 to 15/06/2020 |

### Schedule of Examation

| Sr.No. | Calss | Date / Period |
|---|---|---|
| 1) | B.A./ B.Com/B.Sc. $1^{st}$ $2^{nd}$ & $3^{rd}$ Year | 10/10/ 2019 ($1^{st}$ Term Exam) |
| 2) | B.A./ B.Com/B.Sc. $1^{st}$ $2^{nd}$ & $3^{rd}$ Year | 24/03/ 2020 ($2^{nd}$ Term Exam) |
| 3) | M.A./ M.Com $1^{st}$ & $2^{nd}$ Year | 22 /10/2019 ($1^{st}$ Term Exam) |
| 4) | M.A./ M.Com $1^{st}$ & $2^{nd}$ Year | 13 /04/2020 ($2^{nd}$ Term Exam) |

### Convocation Programme

Tentative Date of Convocation : - Last week of Sept. 2019



Scanned by CamScanner

| कला विभाग | प्राध्यापक वृंद | पदनाम |
|---|---|---|
| मराठी | १) प्रा. श्रीमती पी.बी. महाजन | प्रमुख |
| | २) प्रा. एन.एच.चुणचुणे | |
| हिंदी | १) प्रा. डॉ.जी.एम. भगत | प्रमुख |
| इंग्रजी | २) प्रा. डॉ.सौ.एम. एस. कदम | प्रमुख |
| | ३) प्रा. एम.बी.गायकवाड | |
| इतिहास | १) प्रा. डी.एम. रणदिवे | प्रमुख |
| | २) प्रा. आर.जी. भोसले | |
| समाजशास्त्र | १) प्रा. डॉ.ए.के.पिडगे | प्रमुख |
| | २) प्रा. डॉ.बी.एम.गोरे | |
| राज्यशास्त्र | १) प्रा. डी.आर.चव्हाण | प्रमुख |
| भूगोल | १) प्रा.डॉ. एच.एस.वाघमारे | प्रमुख |
| | २) प्रा. डॉ. एस.एन.उबाळे | |
| | ३) प्रा. डॉ.जी.एल.जाधव | |
| अर्थशास्त्र | १) प्रा. बी.बी.कोकाटे | प्रमुख |
| लोकप्रशासन | १) प्रा. एम.व्ही.चावरे | प्रमुख |
| | २) प्रा. एन.एल. पैठणकर | |
| **क्रीडा विभाग** | १) प्रा. एम.टी.क्षीरसागर | प्रमुख |
| **वाणिज्य विभाग** | १) प्रा. डॉ.बी.एस.खोसे | प्रमुख |
| | २) प्रा. डॉ.आर.एफ.आंबाड | |
| | ३) प्रा. डॉ.पी.एस.देशमुख | |
| | ४) प्रा. डॉ.ए.एस.कानडे | |
| | ५) प्रा. पी.डी. चौधरी | |
| **विज्ञान विभाग** | १) प्रा. ए.आर.जाधव | प्रमुख |
| गणित | २) प्रा. ए.जी.बिडवे | |
| भौतिकशास्त्र | ३) प्रा. एच.ए.खानापुरे | प्रमुख |
| भौतिकशास्त्र | ४) प्रा. व्हि.एच.चांडक | |
| रसायनशास्त्र | ५) प्रा. आर.एच.माळकर | प्रमुख |
| रसायनशास्त्र | ६) प्रा. पी.के.पिसाळ | |
| प्राणीशास्त्र | ७) प्रा. डी.डी.कापसे | प्रमुख |
| वनस्पतीशास्त्र | ८) प्रा. कुमारी पी.एम.जाधव | प्रमुख |
| **ग्रंथालय विभाग** | १) प्रा. एम.एस.बिडवे | (ग्रंथपाल) |

## कार्यालयीन कर्मचारी वृंद

१) श्री.व्ही.सी.चौभारकर-मुख्य लिपीक  २) श्री.डी.बी.पटाडे-वरिष्ठ लिपीक  ३) श्री.एस.एस.पटाडे-ग्रंथालय परिचर

४) श्री.बी.बी.देशमुख -नाईक  ५) श्री.बी.एन.घुटे-सेवक

६) श्री. ए.एन. सवासे -सेवक  ७) श्री. एस.बी.गाडे -सेवक

Scanned by CamScanner

रामदेव ऑफसेट उ,बाद -९४२२४६४२९९

Scanned by CamScanner